एजन्सी वर्ष २० ऑगस्ट १९७५
LIC
फोन ऑ.वि.नि. (02382) 241204
मो.9850644181
४५ वर्ष घरपोच विमा सेवा
सौ.पी.एस.मळगे
मा.चेअरमन्स क्लब मेंबर
शतकवीर, करोडपती, ज्येष्ठ विमा एजंट
(कोड नं.01390945) लातूर - (2) शाखा-98 एच.
'मळगे निवास' प्लॅट नं. ९ तिसरा मजला, शिवकमल सिल्वर आर्च, नंदी स्टॉप, औसा रोड, लातूर-४१३५३१

# प्रतिव्यवहार

PRATIVAHIR | E-mail: dainikprativyvhar@gmail.com | फॅक्स : ०२३८२/२५४२५९

पो.क्र.एल २/आरएनपी/ओएमडी/१२१/२०१८-२० R.N.I 70813/98 कार्यकारी संपादक दिलीप मुनाळे मो.९४२११९६६८३

लातूर-दैनिक वर्ष : ३१ वे अंक : २३२ वा शनिवार, दि. ३ ऑक्टोबर २०२० किं. २ रु. पृष्ठे : ४

फोटो फ्लॅश डिजीटल कलर लॅब, स्टुडिओ
Email: fotoflashlatur@gmail.com
डिजीटल मिडिया प्रिंट
अर्जंट
4"X6" ते 30"X40", पासपोर्ट फोटो
पासपोर्ट फोटो, डिजीटल कॅमेरा, मोबाईल कॅमेरा प्रिंट, डेव्हलोपिंग - प्रिंटिंग
फोटो अल्बम, फोटो फ्रेम, लॅमीनेशन
करिझ्मा अल्बम डिझायनिंग, प्रिंटिंग, बाईंडिंग
या पासून शार्प उठावदार लेजर डिजीटल प्रिंटिंग, करुन मिळेल

# पक्षाच्या आंदोलनास नेत्यांचीच दांडी

लातूर/प्रतिनिधी : केंद्र सरकारने नुकतेच केलेले कायदे शेतकरी विरोधी असल्याचे सांगत त्याचा निषेध करण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने गांधी जयंतीच्या निमित्ताने जिल्ह्याजिल्ह्यात आंदोलने करण्यात आली. लातुरातही आंदोलन झाले परंतु या आंदोलनाला नेत्यांनीच दांडी मारली. त्यांच्याऐवजी स्थानिक शिलेदारांनी आंदोलनाचा सोपस्कार उरकून छायाचित्रणाची हौस पार पाडल्याचे शुक्रवारी दिसून आले.

केंद्र सरकारच्या विरोधात रान पेटवण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने कृषी विधेयकांचे निमित्त करण्यात आले आहे.विशेष म्हणजे गुरुवारी राहुल व प्रियंका गांधी या नेते द्वयांवर कारवाई करून भाजपा आणि योगी सरकारने काँग्रेसच्या हातात आयतेच कोलीत दिले आहे. या पार्श्वभूमीचा लाभ उठवण्याचे मनसुबे काँग्रेसचा धुरिणांनी आखले असावेत.यासाठीच प्रत्येक ठिकाणी गांधीजींच्या जयंती निमित्त आंदोलने करण्याचे फर्मान या पक्षाकडून काढण्यात आले असावे.

## लातुरात पार पडला आंदोलनाचा सोपस्कार

पक्षाकडून या आंदोलनाची जोरदार तयारी करण्यात आली होती. विशेष म्हणजे आंदोलनासाठी निरीक्षकही नेमण्यात आले होते. एकंदर मोदी सरकारच्या विरोधात आवाज उठवून मरगळ आलेल्या पक्षात जान फुंकण्याचा कार्यक्रम पक्षाने आखला असल्याचे यानिमित्ताने जाणवले. परंतु पक्षाच्या मूळ धोरणांना बगल देण्याचे काम लातूरच्या नेत्यांनी शुक्रवारी केले.पक्षाचा अजेंडा किंवा धोरणे राबवताना त्याचे बंधन केवळ पक्ष पदाधिकारी किंवा कार्यकर्त्यांवरच नसते तर नेत्यांनाही असते याचा बहुधा त्यांना विसर पडला असावा. एवढ्या मोठ्या प्रमाणात सर्वत्र आंदोलने होत असताना त्या- त्या जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांनी या आंदोलनात सहभाग घेणे अपेक्षित असते. माजी मुख्यमंत्री आणि नांदेडचे विद्यमान पालकमंत्री अशोकराव चव्हाण यांनी ही आचारसंहिता पाळत तेथील आंदोलनात सहभाग घेतल्याचेही दिसून आले. परंतु त्यांच्या शेजारी असणाऱ्या लातूर जिल्ह्यात पक्षाच्या दोन्ही आमदारांना बहुधा कार्यबाहुल्यामुळे आंदोलनात सहभाग घेता आला नाही. विशेष म्हणजे या दोन पैकी एक आमदार तर मंत्री आहेत. असे असतानाही त्यांची गैरहजेरी हा चर्चेचा विषय ठरला आहे.

काँग्रेस पक्ष आज राज्यात सत्तेत आहे.कदाचित मंत्री म्हणून नेत्यांना एखादे महत्त्वाचे काम असते असू शकते परंतु दुसऱ्या आमदारांना तर तेही नाही. विशेष म्हणजे पक्षाकडून राज्यपातळीवर आंदोलन असताना नेमके त्याच दिवशी इतर काम कसे किंवा कशासाठी? असाही प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतो.

मुळात पक्षाच्या इतिहासात काँग्रेस बहुतांश काळ सत्तेत राहिलेली आहे.२०१४ नंतर राज्यात पाच वर्ष व केंद्रात सहा वर्षाहून अधिक काळ या पक्षाला विरोधक म्हणून काम करावे लागत आहे.केंद्रात विरोधक असला तरी पक्ष राज्यात सत्ताधारी आहे.त्यामुळे 'अंगझाडून' आंदोलनात उतरण्याची नेते व कार्यकर्त्यांची मानसिकता होत नाही.पक्षाकडून निर्देश आलेले असल्यामुळे उपचार म्हणून अशी आंदोलने केली जातात. मग उपचारापुरत्या असणाऱ्या आंदोलनात सहभागी झाले काय आणि न झाले काय ?फारसा फरक पडत नसावा. यातूनच नेत्यांनी आंदोलन मनावर घेतले नसावे, अशीही एक चर्चा आंदोलनस्थळाच्या परिसरात ऐकण्यात आली.

राज्यात आणि लातुरातही कोरोनाचा प्रादुर्भाव झालेला आहे. अशा स्थितीत विनाकारण एकत्रित येऊ नका, गर्दी करू नका, शारीरिक अंतर राखा असे निर्देश केंद्र व राज्य शासनही देत आहे. परंतु या आंदोलनात कार्यकर्ते व पदाधिकारीही बहुधा हे निर्देश विसरले असावेत. त्यामुळे त्यांना भान

(पान २ वर...)

## -: थोडक्यात :-

### महात्मा गांधी विचार मंच तर्फे राष्ट्रपित्यांना अभिवादन...



औसा/प्रतिनिधी - महात्मा गांधी विचार मंच तर्फे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त दि. २ ऑक्टोबर २०२० रोजी औसा येथील गांधी चौकात प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. महात्मा गांधी विचार मंचची २३ वर्षांची अखंड परंपरा कायम ठेवून येथील कार्यकर्त्यांनी महात्मा गांधी यांच्या जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. औसा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सुरेशअप्पा ठेसे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून गांधीजींना अभिवादन करण्यासाठी महात्मा गांधी विचार मंचाचे अध्यक्ष सुनील उटगे, राम कांबळे, दादा कोपरे, माजी नगरसेवक शेख शकील, रशीद शेख, सनाऊल्ला दारुवाले, मुक्तेश्वर पडसळगे, एस ए काझी, किशोर जाधव, मुक्तार मणियार, किशन कोलते, उमाकांत मुर्गे, नंदकुमार सरवदे, सिद्धेश्वर आपुणे, नंदकुमार देशपांडे, विनोद जाधव, मदनसिंह भिसेनी, रमेशअप्पा राचट्टे, दिलावर तत्तापुरे, सुरेश पंचाक्षरी, काशिनाथ सगरे, गौरीशंकर औटी यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### मराठा आरक्षणाचा अध्यादेश काढून मराठा तरूणांना व विद्यार्थ्यांना सरकारने दिलासा द्यावा - माजी आ. कव्हेकर

लातूर/प्रतिनिधी : मागील फडणवीस सरकारने मराठा समाजाला शिक्षणात व नौकरीत आरक्षण दिले होते. त्यामुळे मराठा समाजातील विद्यार्थ्यांना फार मोठा दिलासा मिळाला होता. परंतु नुकतेच सुप्रिम कोर्टाने मराठा आरक्षणाला स्थगिती देवून सर्व सवलती बंद केल्या. त्यामुळे मराठा समाजात फार मोठा असंतोष निर्माण झाला आहे. नुकतेच बीड जिल्ह्यातील विवेक कल्याण रहाडे या विद्यार्थ्यांने गळफास घेतला. १२ वी ला चांगले गुण मिळाल्यानंतर त्याने नीट ची परिक्षा दिली होती. नीट चा पेपर कठीण गेल्याने तो तणावात होता. त्यामुळे मराठा आरक्षणाला स्थगिती मिळाल्याने वैद्यकीय प्रवेशासाठी आपली निवड होणार नसल्याचे त्याला वाटल्याने त्याने हे टोकाचे पाऊल उचलले. मराठा समाजातील कष्टकरी व शेतकऱ्यांच्या मुलांची परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्यामुळे शासनाने कायद्यात दुरूस्ती करून मराठा आरक्षणाचा अध्यादेश काढून मराठा समाजातील तरूणांना व विद्यार्थ्यांना दिलासा मिळवून द्यावा, असे आवाहन भाजपाचे जेष्ठ नेते मा.आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले आहे.

### किनगावच्या महात्मा फुले महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी



किनगाव/प्रतिनिधी - अहमदपूर तालुक्यातील किनगाव येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने २ ऑक्टोबर रोजी सकाळी ठिक ११.०० वा राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव प्रा. डॉ बि आर बोडके होते तर प्रमुख पाहुणे आदर्श सेमी इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक श्री संतोष पवार, प्राचार्य डॉ. बि बि भदाडे यांची उपस्थिती होती यावेळी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या शुभहस्ते पुष्पहार घालून करण्यात आले कार्यक्रमाचे प्रस्ताविक करताना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.बालाजी आचार्य म्हणाले की भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महात्मा गांधी आणि

(पान २ वर...)

### गुरुपदप्पा इळेकर यांचे निधन...



औसा/प्रतिनिधी - औसा येथील वीरशैव समाजाचे कार्यकर्ते गुरुपदप्पा शिवाप्पा इळेकर वय ८२ वर्षे यांचे दि. २/१०/२०२० रोजी पहाटे वृद्धापकाळामुळे दुःखद निधन झाले. माजी नगरसेवक वैजनाथ इळेकर व माजी उपनगराध्यक्ष सोमनाथ इळेकर यांचे ते वडील होते. त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुले, २ विवाहित मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार दि. २ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ : ३० च्या सुमारास औसा येथील वीरशैव समाजाच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## शेतकरी विरोधी काळे कायदे रद्द करण्यासाठी लातूरात काँग्रेस चे धरणे आंदोलन

### ट्रॅक्टर/मोटार सायकल रॅली काढत केंद्र सरकारने घेतलेल्या शेतकरी विरोधी कायद्याचा केला निषेध

**कायदे रद्द करा अन्यथा उग्र आंदोलन करु - श्रीशैल्य उटगे**

केन्द्राने घेतलेले कामगार व शेती विरोधी कायदे रद्द करावे अन्यथा आम्हाला पुन्हा रस्त्यांवर यावे लागेल असा इशारा देऊन खासदार राहुल गांधी यांच्यावर उत्तरप्रदेश सरकारने केलेल्या धक्काबुक्किचा निषेध व्यक्त केला आहे



लातूर/प्रतिनिधी :

केंद्र सरकारने आणलेले शेतकरी विरोधी काळे कायदे मागे घ्यावेत या मागणीसाठी लातूर जिल्हा काँग्रेस व शहर जिल्हा काँग्रेस पक्षाच्या वतीने लातूरात महात्मा गांधी चौकात शुक्रवारी मोठ्या प्रमाणात पदाधिकारी कार्यकर्ते उपस्तीत राहून केंद्र सरकारचा निषेध व्यक्त करत ३तास धरणे आंदोलन करण्यात आले या आंदोलनास शेतकरी,कामगार मजुर यानी उपस्तीत राहून सकारात्मक प्रतिसाद दिला आहे धरणे आंदोलन प्रदेश काँग्रेस चे निरिक्षक आमदार राजेश राठोड यांच्या उपस्तीत जिल्हा अध्यक्ष श्रीशैल्य उटगे ,शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अँड किरण जाधव यांच्या नेतृत्वाखाली पार पडले

धरणे आंदोलन सम्पलावर शहरातून काँग्रेसच्या वतीने ट्रॅक्टर व मोटार सायकल रैली काढत केंद्र सरकारने घेतलेल्या शेतकरी व कामगार कायद्याचा निषेध व्यक्त करत ही रैली डॉ बाबासाहेब

(पान २ वर...)

## लाडवाडी येथे विजेचे करंट लागुन बैलाचा मृत्यू

किल्लारी/प्रतिनिधी -

लाडवाडी ता.औसा येथे गुरुवारी सकाळी बैलगाडी घेऊन शेताकडे जातआसताना लाईटपोलजवळील चिकलात करंट लागुन हानम जातीचा बैल मरुन ४५००० रुपयाचे नुकसान झाले

पोलीससुत्राकडुन मिळेलेल्या माहीती नुसार किल्लारी पोलीसस्टेशन हद्दीतील लाडवाडी ता. औसा येथे दिनांक १-१०-२० गुरुवारी सकाळी १०-३० वाजनेच्या सुमारास तेथील शेतकरी अनील अनील रंगनाथ तौर हे बैलगाडी घेउन आपल्याला शेताकडे जात असताना गावा मध्येच मारुतीच्या मंदीराजवळ लाईट पोलच्या जवळ पाणीचिकल साठला होता त्यामधुन जात आसताना त्या पाणी चिकलमध्ये करंट उतरल्यामुळे एका हानम बैलाला करंट लागल्या मुळे मृत्यू झाला त्यामुळा ४५,०००/- रुपयाचे नुस्कान झाले आहे

शेतकरी आनील रंगनाथ तौर लाडवाडी यांच्या फि-यादीनुसार किल्लारी पोलीसस्टेशन ला ठाणेआमलदार -ीळमाने एस. आर याने गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास बिराजदार पोहे सचीन उस्तुरगे करीत आहेस.

## हाथसर अत्याचार प्रकरणी सम्राट मित्रमंडळाचे धरणे निदर्शने अंदोलन

**हाथरस (उत्तरप्रदेश) येथे पिडीत मुलीच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी जात असताना काँग्रेसचे राष्ट्रीय नेते राहुलजी गांधी यांच्या विरोधात पोलिसांनी बळाचा वापर करून धक्काबुक्की केली.त्याच्या निषेधार्थ उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या प्रतिमेचे दहन करून त्यांच्या विरोधात घोषणाबाजी यावेळी करण्यात आली.**

### आरोपींना फाशीची मागणी...!!



अहमदपूर/प्रतिनिधी :

हाथरस (उत्तर प्रदेश)येथील दलीत कुटुंबातील मुलीवर सामूहीक अत्याचार करून जीवे मारण्याच्या घटनेचा येथील सम्राट मित्रमंडळाच्या वतीने यूवकनेते डॉ. सिध्दार्थकूमार सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली तहसिल कार्यालयासमोर धरणे व निदर्शने अंदोलन करून निषेध व्यक्त करण्यात आला.

तहसिलदार अहमदपूर यांच्या मार्फत राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना दिलेल्या निवेदनात पूढे म्हटले आहे की, हाथरस(उ.प्र.)येथील दलित कुटुंबातील मुलीवर सामूहीक अत्याचार करून तीची जीभ कापून अमानुष कृत्य केले आहे.यात तीचा मृत्यू झाला असून सदरचा खटला

(पान २ वर...)

## शेतकरी-कामगार विरोधी कायद्याचा निषेधार्थ काँग्रेसचे धरणे आंदोलन



औसा/प्रतिनिधी :

केंद्रातील भाजप सरकारने शेतकरीविरोधी तीन विधेयके व कामगार विरोधी विधेयके हुकूमशाही पद्धतीने मंजूर करून घेतल्यामुळे जनसामान्यांमध्ये व शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष आहे. त्यामुळे हे अन्यायकारक कायदे मागे घेण्यात यावीत, या मागणीसाठी उस्मानाबाद जिल्हा काँग्रेसच्या वतीने जिल्हाभर शुक्रवार, दि.२ ऑक्टोबर रोजी *धरणे आंदोलन* करण्यात आले.तसेच शेतकरी यांच्या सह्याचा शुभारंभ ही करण्यात आला

उस्मानाबाद येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी कार्याध्यक्ष मा.बसवराज पाटील, माजी मंत्री मा. मधुकरराव चव्हाण, जिल्हाध्यक्ष मा.धीरज पाटील, माजी अध्यक्ष विश्वासराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले.

प्रथम मान्यवरांच्या हस्ते पुष्पार्पण करून महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी मान्यवरांनी शेतकरी व कामगार विरोधी कायदे अन्यायकारक असून केंद्र सरकारने सदरील कायदे रद्द करण्याची मागणी केली.

यावेळी निरीक्षक कल्याण दळे, जिल्हा बँकेचे

(पान २ वर...)

## जागतिक बाजारपेठेच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठी धरणे आंदोलन

### शेतकरी संघटनेचा केंद्राच्या कायद्यांना पाठिंबा, विधेयकात दुरुस्त्या करण्याची मागणी



लातूर/प्रतिनिधी :

केंद्र सरकारने नुकत्याच संमत केलेल्या शेतकरी विषयक कायद्यांना शेतकरी संघटनेचा पाठिंबा आहे. परंतु त्यातील काही तरतुदींची दुरुस्ती करणे आवश्यक असून या दुरुस्त्या करून शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेचे संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात यावे या मागणीसाठी गांधी जयंतीचे औचित्य साधत शेतकरी संघटनेच्या वतीने धरणे आंदोलन करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

केंद्र सरकारने कृषी व्यापारासंबंधी जी तीन विधेयके संसदेत मंजूर करून घेतली ती शेतकऱ्यांच्या फायद्याची ठरणार आहेत.या विधेयकांच्या माध्यमातून सरकारने शेतकऱ्यांना व्यापाराचे काही प्रमाणात स्वातंत्र्य दिले आहे. परंतु आवश्यक वस्तु कायद्याच्या कक्षेतून वगळलेल्या शेतमालाचे दर ठराविक पातळीपेक्षा जास्त वाढल्यास ती पिके पुन्हा आवश्यक वस्तु कायद्याच्या कक्षेत घेण्याबाबत केलेली तरतूद ही एकूणच सुधारणा विधेयकांच्या हेतुशी विसंगत आहे.

(पान २ वर...)

## कुटूंब सल्ला केंद्र औसा येथे परमपूज्य महात्मा गांधी यांची जयंती साजरी



औसा/प्रतिनिधी :

केंद्रीय समाजकल्याण बोर्ड द्वारा मान्यता प्राप्त स्वयंसिद्धा महिला मंडळ लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी अशा महान व्यक्तीचे जयंती साजरी करण्यात येथे त्याचबरोबर कुटूंब सल्ला केंद्र औसा यांच्या विद्यमाने असे एक नव्हे तर अनेक कार्यक्रम घेतले जातात आणि

(पान २ वर...)

## कोणाचेही हितसंबंध लातूरकरांच्या आरोग्याच्या आड येऊ देणार नाही - महापौर

लातूर/प्रतिनिधी : मागील सत्ताधाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे शहराचे घनकचरा व्यवस्थापन बिघडले होते. त्यात आता आमूलाग्र बदल करण्यात येत आहेत. १ जानेवारी ते ३१डिसेंबर २०१९ या कालावधीत भाजपाचे पदाधिकारी पालिकेत सर्व महत्वाच्या पदावर कार्यरत होते त्याच कालावधीत स्वच्छ सर्वेक्षणात लातूर शहराचा नीचांकी १३७ वा क्रमांक आला होता. कचरा व्यवस्थापनाबाबत पालिका गंभीर असून कोणाचाही दबावाला बळी न पडता कंत्राटदाराने केलेल्या कामांचीच देयके अदा केली जाणार आहेत. कोणाचे हितसंबंध लातूरकरांच्या आरोग्याच्या आड येऊ देणार नाही अशी ठाम भूमिका महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी व्यक्त केली.

२०१७ साली शहरातील घनकचरा व्यवस्थापन सुरळीत करण्यासाठी स्थायी समितीचे तत्कालीन सभापती अशोक गोविंदपूरकर यांच्या काळात घनकचरा व्यवस्थापनासाठी नव्याने प्रक्रिया राबविण्यात आल्या होत्या. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०१८ या

(पान २ वर...)

### जबाबदारीचे भान कधी येणार?

**लातूर शहर महानगरपालिकेत स्थायी समिती सभापती आणि सभागृह नेते या दोन महत्त्वाच्या पदावर आजही भाजपाचेच पदाधिकारी आहेत. स्थायी समिती सारखे आर्थिक व प्रशासकीय विषयावर नियंत्रण ठेवणारे आणि महत्त्वाची भूमिका बजावणारे सभागृहनेते पद भाजपाकडे आहे. या दोन्ही पदांना विशिष्ट जबाबदाऱ्या आहेत. या माध्यमातून शहरातील विविध प्रश्नांच्या अनुषंगाने तेदेखील काम करू शकतात. परंतु लोकोपयोगी कामात या दोन्ही पदावरील व्यक्तींचा किंवा त्यांच्या पक्षाचा कोठेही सहभाग असल्याचे आढळत नाही. कार्यात सहभागी न होता केवळ व्यक्ती द्वेषापोटी आरोप करण्याचे काम त्यांच्याकडून केले जात आहे. जबाबदारी जशी महापौर व उपमहापौर यांची आहे तशीच स्थायी समिती सभापती व सभागृह नेते यांचीही असू शकत नाही का?जबाबदारीचा स्वीकार ते केंव्हा करणार?त्यांची पालिकेत काहीच जबाबदारी नसेल तर मग पदे कशासाठी असतात?असा सवालही यानिमित्ताने उपस्थित होत आहे.**



## संपादकीय...

# प्रस्तावित बदल करा

कामगार कायद्यांच्या जंजाळाऐवजी तीन संहितांमध्ये सुसूत्रीकरण आणि नेमणूकपत्राच्या बंधनामुळे अधिकाधिक कामगारांचा संघटित क्षेत्रात समावेश, हे तर स्वागतार्हच..

वाजपेयी सरकारपासून 'प्रस्तावित' असलेल्या या संहितांत संसदीय समितीने सुचवलेले अनेक बदल अंतर्भूत आहेत. आता प्रश्न उरेल, तो समाजमान्यतेचा..

कामगार कायद्यांतील गेली कित्येक वर्षे खोळंबून राहिलेल्या सुधारणा रेटल्याबद्दल नरेंद्र मोदी सरकारचे अभिनंदन. कामगार हा विषय आपल्याकडे खेडे या विषयासारखा आहे. उगाचच भावनिक उमाळे काढायचे. जणू प्रत्येक खेडे नंदनवनच आणि प्रत्येक कामगार हा क्रांतिकारक. असे मानण्यास हरकत नाही. पण तसे करताना याचा विरोधार्थदेखील खरा मानला जातो. म्हणजे खेडय़ांच्या तुलनेत शहरे उपभोगवादी आणि कामगारांच्या तुलनेत मालक शोषक. या अशा विचारधारेतून या दोन्हींचे उगाच उदात्तीकरण झाले आणि दोन्ही उत्तरोत्तर बकाल होत गेले. अशा विचारधारेच्या प्रांगणात कामगार सुधारणांना हात घालणे तसे धाष्टर्य़ाचेच. ते धारिष्टय़ मोदी सरकारने दाखवले म्हणून सरकार नि:संशय अभिनंदनास प्राप्त ठरते.

शेतीसंदर्भातील तीन वादग्रस्त विधेयकांच्या पार्श्वभूमीवर या कामगार सुधारणा झाल्याने त्यांना वादाची झळ लागली. त्यात ही विधेयके शेती विधेयकांच्या मुद्दय़ावर संसदेवर बहिष्कारात असलेल्या विरोधी पक्षांच्या अनुपस्थितीत मंजूर झाली. तथापि शेती विधेयकांप्रमाणे या विधेयकांवर चर्चा झालेली नाही, असे नाही. गेले वर्षभर या विधेयकांवर संसदेच्या समितीत चर्चा झाली आणि तीत सर्वपक्षीयांचा समावेश होता. सरकारने मांडलेल्या मूळ कामगार सुधारणा विधेयकावर या समितीमार्फत जवळपास शंभरभर सुधारणा सुचवल्या गेल्या आणि त्यापैकी तीनचतुर्थाश स्वीकारल्या जाऊन त्या अनुषंगाने विधेयकांत बदल केले गेले. तेव्हा आमच्या अनुपस्थितीत मंजूर झालेली ही विधेयके कामगारविरोधी आहेत असा टाहो काही विरोधी नेत्यांनी फोडला असला तरी तो खरा नाही. वर्षभराच्या साधक-बाधक चर्चेनंतर मुदलात अटलबिहारी वाजपेयी सरकारने प्रस्तावित केलेल्या या सुधारणांना अखेर कायद्याचे स्वरूप आले, ही बाब आपल्या औद्योगिक विकास आणि स्थैर्य यासाठी आश्वासक ठरते. म्हणून तिचे स्वरूप समजावून घेणे आवश्यक. याचे कारण आपल्याकडे कामगार कायदे इतके गुंतागुंतीचे आणि परस्परविरोधी आहेत की त्याचे समग्र आकलन साक्षात बृहस्पतीसदेखील अशक्य ठरेल. चारशेहून अधिक कलमे, तितकीच उपकलमे/ विभाग आणि साधारण तीनशे पाने इतक्या ऐसपैस पसरलेल्या कामगार कायद्यांच्या जंजाळात कामगार आणि उद्योग दोघेही पायात पाय अडकून पडले. परत कामगार हा केंद्र आणि राज्य यांच्या संयुक्त यादीत. त्यामुळे देशभर एकच एक असा कामगार कायदा नाही. या संदर्भात खुद्द केंद्र सरकारच्या पातळीवरच किमान १५ कायदे आहेत आणि राज्यांच्या कामगार कायद्यांची संख्या शंभराहून अधिक आहे. याच्याच सुसूत्रीकरण आणि संपादनासाठी अटलबिहारी वाजपेयी सरकारने माजी केंद्रीय कामगारमंत्री रवींद्र वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय कामगार आयोग नेमला. वर्मा हे काँग्रेसी. पण ही बाब; इतकी महत्त्वाची जबाबदारी त्यांच्याकडे देण्याआड कधी आली नाही. ही तेव्हाची राजकीय प्रगल्भता. असो. वर्मा यांच्यानंतरही या आयोगाच्या शिफारशी तशाच फाइलबंद राहिल्या. त्यांस आता मुक्ती मिळेल. यातून कामगार कायद्यात आमूलाग्र बदल होणार असून काही अतिजुनाट, इंग्रजकालीन कायदे कालबा होतील वा त्यांना आधुनिक, कालसुसंगत चेहरा मिळेल. तसा तो मिळावा यासाठी जवळपास २९ विविध कायदे तीन संहितांमध्ये विसर्जित केले गेले. फॅक्टरी ॲक्ट, औद्योगिक विवाद कायदा, कामगार संघटना, खनिकर्म कामगार, चित्रपट कामगार, चित्रपटगृह कामगार, श्रमिक पत्रकार आदी अनेक कायद्यांचे भरताड सध्या वागवावे लागते. काही कायदे इतके हास्यास्पद आणि कालबाह्य़ आहेत की त्यांची अंमलबजावणी अधिक हास्यास्पद आणि लाजिरवाणी ठरते. ते आता कमी होईल. कामगारांची सामाजिक / आर्थिक सुरक्षितता, औद्योगिक संबंध आणि कार्यकालीन सुरक्षितता आणि आरोग्य या तीन संहिता आता सर्व कामगार कायद्यांना सामावून घेतील. यातून कायद्यांची आणि नियमांची पुनरुक्ती टळून व्यवसायसुलभता निर्माण व्हायला मदत होईल. सध्या कर्मचाऱ्यास कामावरून काढणे जिकिरीचे असते. कामगारांची एकूण संख्या १०० वा अधिक असलेल्या कारखान्यांतून कामगारांना कमी करण्यासाठी सरकारची परवानगी आवश्यक. यास वळसा घालण्यासाठी यापेक्षा अधिक कामगारांची नेमणूक करावयाची वेळ आल्यास ९९ वर भरती थांबवून संबंधित उद्योजक वेगळी आस्थापना तयार करून तेथे अधिक भरती करतात. ही १००ची मर्यादा आता ३०० होईल. नव्या अमलात कामगारांचा संप करणे सोपे असणार नाही. पूर्वसूचना दिल्याखेरीज संप करणे अशक्यच असेल. याची गरज होती. कारण आपल्याकडे काही मोजके अपवाद वगळता कामगार नेते हे प्रकरण लायकीपेक्षा अधिक मोठा गंड आणि खंडणीखोरी यासाठीच ओळखले जाते. त्यांच्याकडे व्यवस्थापनाने दुर्लक्ष केल्यास समस्त कामगारांकडे दुर्लक्ष केल्याची आरोळी ठोकली जाते. त्यातून मग तत्क्षणी संप वगैरे गुंडगिरी आली. ती आता बंद होईल. तसेच यापुढे सर्व कामगार, कर्मचाऱ्यांना अधिकृत नेमणूकपत्र देणे आवश्यक असेल. त्यामुळे सांगायची एक रक्कम आणि द्यायची दुसरीच अशा वेठबिगारीस आळा बसेल. याचा परिणाम अंतिमत: अधिकाधिक कामगार संघटित क्षेत्रात येण्यात होईल. ही बाब गरजेची आहे. कारण विद्यमान व्यवस्थेत अनेक कामगारांचा थांगपत्ताच नसतो. नव्या व्यवस्थेत मोठा बदल आहे तो असंघटित कामगारांसाठी. आपल्याकडे 'कामगार हित' ही संकल्पना वापरली जाते ती संख्येने जेमतेम १४-१५ टक्के असलेल्या संघटित कामगारांसाठी. यांचा आवाज मोठा त्यामुळे तो ऐकला जातो. असंघटित कामगार कोणाच्या खिजगणतीतही नसतात. २०१६ सालच्या नोव्हेंबरात निश्चलनीकरणाच्या अकल्पित लाटेत देशोधडीला लागला तो हा वर्ग. नव्या कायद्यात या असंघटितांना सामाजिक सुरक्षा रिंगणात आणून मोदी सरकार त्या वेळच्या त्यांच्या हालअपेष्टांची उतराई होत आहे असे म्हणता येईल. कोणताही कायदा परिपूर्ण असू शकत नाही. हादेखील नाही. पण तरीही हे निश्चितपणे त्या दिशेने टाकलेले पाऊल आहे. प्रश्न असेल तो त्याच्या मान्यतेचा. मोदी यांच्यासाठी ते आव्हान घरातूनच सुरू होईल. किंबहुना ते तसे झालेच आहे. कारण राष्ट्रीय स्वयंसेवक संघ-प्रणीत भारतीय मजदूर संघाने या कायद्याविरोधात लगेचच नाराजीचा सूर लावला असून हे बदल 'जरा अतिच' मालक-धार्जिणे आहेत, असे म्हटले आहे. लवकरच या 'उजवी'कडील सुरात कामगारांच्या मूळ हितरक्षक डावीकडूनही सूर मिसळला जाईल. मध्यंतरी मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आदी राज्यांनी असा कामगार कायद्यांत सुधारणांचा घाट घातला होता. पण भारतीय मजदूर संघाने डोळे वटारल्यावर या सुधारणांच्या तलवारी पुन्हा म्यान झाल्या. याचे स्मरण अशासाठी करायचे की पुढे काय वाढून ठेवले आहे याचा अंदाज संबंधितांस यावा. सुधारणा या नेहमीच 'मेन्यू'कार्डावर आकर्षक वाटतात. प्रत्यक्षात ताटात पडल्या की त्यांची चव कळते आणि अपेक्षित गोडवा नसल्याचे ध्यानी येते. हा आपला इतिहास आहे.

# धक्कादायक : लातुरकरांचे आरोग्य धोक्यात...!

## राज्यात अस्वच्छतेत लातूरचा डंका...भाजपाचे राष्ट्रपिता महात्मा गांधींना साकडे

लातूर/प्रतिनिधी :

केंद्र शासनामार्फत घेण्यात येणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षण अभियान २०२० मध्ये लातूर शहर देशात १३७व्या व महाराष्ट्रात ३३ व्या क्रमांकावर आलेले आहे. स्वच्छ आणि सुंदर लातूर अशी लातुर महानगरपालिकेच्या माध्यमातून जाहिरात करणाऱ्या लातुरच्या नशिबी यंदा अस्वच्छतेचा ठपका बसलेला आहे.त्यामुळे लातुरकरांचे आरोग्य आता धोक्यात आलेले आहे.त्यामुळे लातुरातील वास्तव परिस्थिती लक्षात घेवुन लातुरची विकासात्मक दुरदृष्टीता लक्षात घेऊन लातूर भाजपाच्या वतीने गांधी जयंतीचे औचित्य साधून महात्मा गांधींजींच्या पुतळ्याला निवेदन देवून स्वच्छ आणि सुंदर लातुरचे स्वप्न साकार करण्याची विनंती केलेली आहे.

स्वच्छ आणि सुंदर लातुर करण्याची जाहीरात मनपाच्या घंटागाडीच्या माध्यमातून दररोज केली जाते.शिक्षणात लातूर पॅटर्न निर्माण करणारया लातूरची अशी अवस्था असेल तर इतर शहरांचे काय असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. लातूर शहर हे महाराष्ट्रातील स्वच्छ सर्वेक्षणात सर्वात अस्वच्छ शहर म्हणून समोर आलेले आहे. २०२० च्या स्वच्छ सर्वेक्षणात सर्वात शेवटचा क्रमांक लातूर शहराने मिळवला.

भारतीय जनता पार्टीची महापालिकेत सत्ता असताना स्वच्छ सर्वेक्षण २०१७ मध्ये लातुरचा देशात ३१८ वा क्रमांक होता सुधारणा करून स्वच्छ सर्वेक्षण २०१८ मध्ये हे १२५ वर आला व शहर स्वच्छ सर्वेक्षण २०१९ मध्ये लातूर ३८व्या क्रमांकावर भारत देशांमध्ये आला व सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट मध्ये लातूर शहरांनी भारतातून पहिला क्रमांक मिळवण्याचे काम २०१९ मध्ये केलं. आताच तेच कॉन्ट्रॅक्टर आहेत तेच प्रशासन आहे परंतु सत्तांतर झालेलं आहे मनपात सध्या कांग्रेसची सत्ता आहे.आणि स्वच्छ सर्वेक्षण २०२० मध्ये लातूर शहर देशांमध्ये १३७ वा क्रमांक व महाराष्ट्रात सर्वात शेवटचा क्रमांक मिळवला आहे. लातूर शहरांमध्ये ते अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साठलेले मिळतात.आपण स्क्रॅप मार्केट रोड असेल किंवा फ्रुट मार्केट असेल स्वर्गीय विलासराव देशमुख



साहेबांची कमानी जवळचा परिसर असेल अशी अनेक ठिकाणे आहेत.अशा ठिकाणी आपल्याला कचऱ्यांचे सम्राज्य दिसेल . महापालिका आपल्या घरातून कचरा वेगवेगळा करून घेत असेल परंतु ते एकत्रितपणे कुठेतरी जाऊन टाकतात या कचऱ्यांचे वर्गीकरण करण्याच्या प्रयत्नाचा काय उपयोग. घंटागाडी मध्ये कचरा घेऊन जात असताना वेगवेगळ्या घेऊन जायचा आणि नंतर कुठेतरी एकत्रितपणे टाकायचा मग तो कचरा वेगळा घ्यायचा तरी कशासाठी हे नाटक कशासाठी? असा प्रश्न सुजान लातुरकरांतून उपस्थित केला जात आहे.त्यामुळे आतातरी लातुर महानगरपालिकेने लक्ष्य देवून लातूरकरांच्या आरोग्याचा विचार करून लातुरच्या स्वच्छतेचा विषय मार्गी लावावा अशी मागणी भाजपाच्यावतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आलेली आहे.

या निवेदनावर भाजपा शहर जिल्हाध्यक्ष भारतीय जनता पार्टी लातूर शहर अध्यक्ष गुरुनाथ मगे, महानगर पालिका गटनेते शैलेश गोजमगुंडे, भारतीय जनता युवा मोर्चाचे शहराध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, रवी सुडे ,ओबीसी मोर्चा अध्यक्ष देवा गडदे ,अनुसूचित जाति मोर्चा अध्यक्ष विजय अवचारे,यावेळी भाजपा युवा मोर्च्याचे मंगेश बिराजदार, अमोल गित्ते, गणेश गोजमंगुडे, सागर घोडके, गजेंद्र बोकन,आकाश बजाज, काका चौगुले, धनराज साळुंके, राजेश पवार, प्रेम मोहिते , वल्लभ वावरे,अदित्य कासले, व्यंकटेश हांगरगे, ओम धरणे, सचिन सुरवसे, निरज गोजमगुंडे, संतोष तिवारी, शैलेश बिराजदार, नवनाथ ढेकरे, अभिजीत गंभीरे, महादेव पिटले, सिदाजी पवार, परवेज शेख, ईश्वर सातपुते, करण हाके, वैभव डोंगरे, श्रीकांत भराडीया,श्रीकांत दुबे, सुयेश पंपटवार, रुद्र बेरिकर, आकाश कोली, आतिन्द्र बर्दापुरकर, लव साठे, राघव तपडीया,आकाश पिटले, उमेश इरपे, आदीच्या स्वाक्षऱ्या आहेत

देशात हिरो झालेली, मनपा यंदा राज्यात झिरो..

वर्षभरापुर्वि लातूरचे पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सत्तापरिवर्तन झाले परंतु स्वच्छतेच्या बाबतीत प्रगती होण्याऐवजी अधोगतीच झाली. विकासात्मक काहीही बदल नाही. महापालिका प्रशासनाला सांगून उपयोग नाही. म्हणून आज गांधी जयंतीनिमित्त ज्या बापूंनी आपल्याला स्वच्छतेचे धडे दिले त्यांना निवेदन देऊन अशी प्रार्थना करण्याची वेळ लातूरकरांवर आलेली आहे.त्यामुळे आतातरी लातूर मनपा शहराच्या प्रशासनाला सद्बुद्धी देवो आणि लातूरकरांचं धोक्यात येणार आरोग्य टाकण्याचं काम मनपाकडून करावे अशी मागणी भाजपा युवा मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला देण्यात आलेल्या निवेदनात केली आहे.

## दयानंद कला महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी



लातूर/प्रतिनिधी : संपूर्ण विश्वाला अहिंसेची शिकवण देणाऱ्या महात्मा गांधींजीची शुक्रवारी दि.०२ ऑक्टोबर रोजी १५१ वी जयंती दयानंद कला महाविद्यालयात साजरी करण्यात आली.अभिवादन कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड व मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजीराव जवळेकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले तर दिवंगत पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला उपप्राचार्य अनिलकुमार माळी व कार्यालयीन अधिक्षक नवनाथ भालेराव यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शिवाजी गायकवाड यांनी असे प्रतिपादन केले की ,महात्मा गांधी हे भारताचे आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे महत्वाचे राजकीय आणि अध्यात्मिक नेते होते. त्यांनी सत्याग्रहाच्या मार्गाने अत्याचारांविरुद्ध अहिंसक पद्धतीने लढा उभारून भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात सुद्धा महत्वपूर्ण योगदान आहे.

सत्य, शांती आणि अहिंसेचे प्रतिक म्हणून संयुक्त राष्ट्र संघाने २००७ साली महात्मा गांधी यांचा जन्म दिन हा जागतिक अहिंसा दिवस म्हणून साजरा करण्यात सुरुवात केली आहे. तसेच दिवंगत पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून जय जवान जय किसान हा नारा देऊन भारताला आंतरराष्ट्रीय पटलावर लष्करीदृष्ट्या संपन्न देश ही ओळख निर्माण करून देऊन भारताच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेला एक नवी दिशा देण्याचे कार्य केले असे प्रतिपादन डॉ शिवाजी गायकवाड यांनी या प्रसंगी केले .

राष्ट्रपिता महात्मा गांधी व दिवंगत पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या अभिवादन कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य अनिलकुमार माळी, पर्यवेक्षक डॉ.दिलीप नागरगोजे , डॉ. शिवाजीराव जवळेकर, डॉ. रमेश पारवे, डॉ. प्रदीप सुर्यवंशी, रा.से.यो.जिल्हा समन्वय डॉ. संतोष पाटील, राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयक डॉ संदिपान जगदाळे, रा. से. यो कार्यक्रमाधिकारी डॉ. सुनिता सांगोले, प्रा. विलास कोमटवाड, प्रा.सुरेश क्षीरसागर, प्रा. शैलेश सुर्यवंशी, प्रा. महेश जंगापल्ले, कार्यालय अधीक्षक नवनाथ भालेराव, आदी उपस्थित होते.






पान १ वरून...

### कोणाचेही हितसंबंध लातूरकरांच्या आरोग्याच्या आड येऊ देणार नाही - महापौर

कालावधीसाठी केंद्र सरकारने केलेल्या स्वच्छ सर्वेक्षणात लातूर शहरास प्रथम पारितोषिक मिळालेले होते. त्यातही प्रामुख्याने प्रभाग क्रमांक ५ मधील ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती प्रकल्प तसेच टाकाऊ प्लास्टिकपासून तयार करण्यात आलेल्या डांबरी रस्त्याची विशेष नोंद घेऊन त्याची प्रशंसाही करण्यात आली होती. सदर पारितोषिक घनकचाऱ्यावर नावीन्यपूर्ण उपक्रम राबविल्याकरिता देण्यात आला होता.

महापौर गोजमगुंडे म्हणाले की, मागील काळात महानगरपालिकेत सत्तेत असणाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे १ जानेवारी ते ३१डिसेंबर २०१९ या कालावधीसाठी करण्यात आलेल्या स्वच्छ सर्वेक्षणात नीचांकी १३७ वा क्रमांक प्राप्त झाला. यादरम्यान महापौर-उपमहापौर,स्थायी समिती सभापती, परिवहन समिती सभापती,सभागृह नेते या सर्व पदांवर भाजपा पदाधिकारी कार्यरत होते. केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानास निष्क्रिय भाजपा पदाधिकाऱ्यांनी स्वतःचे आर्थिक हितसंबंध जपत हरताळ फासला होता.

पालिकेची सूत्रे स्वीकारल्यानंतर महापौर विक्रांत गोजमगुंडे व उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांनी लॉकडाऊन कालावधी संपल्यापासून घनकचरा व्यवस्थापन सक्षम करण्यावर भर दिला आहे. योग्य काम केल्याशिवाय व त्या कामाचे मूल्यमापन केल्याशिवाय कंत्राटदाराची कोणतेही देयके अदा न करण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. तसे आदेशही देण्यात आलेले आहेत. महापौर व उपमहापौर यांनी वरवंटी येथील कचरा डेपोस तीन वेळा भेटी देऊन आढावा घेतला. नवीन वजन काटा बसवणे तसेच काँक्रीट प्लॅटफॉर्म विकसित करण्याच्या कामाचा प्रारंभही केला.संपूर्ण कचरा डेपो सीसीटीव्हीच्या निगराणीखाली आणण्यात आला. घंटागाड्यांना जीपीएस यंत्रणा बसवण्यात आली. विवेकानंद चौकातील ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला. सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यास सुरुवात करण्यात आली. शहरात साई रोड व ठाकरे चौक येथे सुका कचरा प्रक्रिया केंद्र उभारणी सुरू असून त्याचे काम अंतिम टप्प्यात असल्याची माहितीही महापौर गोजमगुंडे यांनी दिली.

महापालिकेच्यावतीने घनकचरा व्यवस्थापन कार्यप्रणालीत आमूलाग्र बदल करण्यात आला आहे.सहाय्यक आयुक्त मंजुषा गुरमे यांची त्यासाठी नियुक्ती करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत शहरातील कचरा हटविण्यात येत असून महापौर व उपमहापौर स्वतः रात्री-अपरात्री देखील भेट देऊन वारंवार पाहणी करत आहेत. यामुळे नागरिकांमध्ये समाधान दिसून येत आहे.

मागील काळात कंत्राटदारांची बिले योग्य पद्धतीने न तपासता तसेच ओला व सुका कचरा वर्गीकरण होत नसतानाही बिले देण्याचे प्रकार घडले असल्याचे दिसून आले आहे.परंतु नूतन महापौर व उपमहापौरांनी केवळ केलेल्या कामाची देयके पूर्णपणे तपासून अदा करण्यासंदर्भात प्रशासनाला निर्देशित केलेले आहे. कंत्राटदारांच्या वतीने काही नगरसेवकांच्या मार्फत असे होऊ नये यासाठी दबाव टाकण्याचा प्रयत्नही केला जात आहे. तरीदेखील या दबावाला बळी न पडता केलेल्या कामाचीच देयके अदा करण्यात येतील अशी स्पष्ट भूमिका महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी घेतलेली आहे.

**प्रभाग ५ वगळता इतर खत निर्मिती प्रकल्प बंदच ...**

महापौर व उपमहापौर यांनी ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती प्रकल्पांचा स्वतः भेटी देऊन आढावा घेतला.यादरम्यान प्रभाग क्रमांक ५ वगळता इतर सर्व खत निर्मिती प्रकल्प बंद असल्याचे आढळून आले होते. प्रभाग १८ मधील खत निर्मिती प्रकल्प तर पूर्णपणे पाडून टाकत कायमचा बंद करण्यात आलेला दिसून आला.प्रभाग ६ व प्रभाग ११ मधील प्रकल्पही पूर्णपणे बंद असल्याचे आढळले.विशेष म्हणजे या तीनही प्रभागांचे प्रतिनिधित्व भाजपाचे नगरसेवक करतात.

### जागतिक बाजारपेठेच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठी धरणे आंदोलन

शेतीमाल व्यापारात अशी अनिश्चितता असल्यास शेती क्षेत्रात मोठी गुंतवणूक होण्याची शक्यता नाही.यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला कधीही किफायतशीर दर मिळण्याची शक्यता राहणार नाही अशी आता शेतकऱ्यांची धारणा तयार होत आहे. केंद्र सरकारने काही दिवसांपूर्वीच कांद्याच्या निर्यातीवर घातलेली बंदी हे त्याचे ताजे उदाहरण आहे. शेतकऱ्यांना अर्धवट नव्हे तर पूर्ण स्वातंत्र्य हवे आहे. विधेयकातील ही तरतूद शेतकरी, व्यापारी, निर्यातदार मोठे गुंतवणूकदार सर्वांनाच मारक आहे. ही तरतूद देशहितासाठीही बाधक अशीच आहे.

सरकारने या विधेयकांचे कायद्यात रूपांतर करताना आवश्यक वस्तु कायद्याबाबत त्रुटीमध्ये सुधारणा करून शेतकऱ्यांना संपूर्ण स्वातंत्र्य द्यावे. तसे न झाल्यास शेतकरी संघटनेचा संपूर्ण स्वातंत्र्यासाठी केंद्रशासनाच्या विरोधातील लढा सुरूच राहील, असे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पंतप्रधानांना पाठवलेल्या निवेदनात म्हटले आहे.

शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष मदन सोमवंशी, प्रदेश सदस्य माधव मल्लेशे, युवा जिल्हाध्यक्ष रुपेश शंके, माजी जिल्हाध्यक्ष माधव कंदे,कार्याध्यक्ष बालाजी जाधव, हरिश्चंद्र सलगरे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात बाबाराव पाटील, शंकर निला, प्रताप पाटील, गुंडेराव उमाटे,कालिदास भंडे,अशोक भोसले, संतोष शिंदे, विठ्ठल गोरे, करण भोसले, बालाजी महाके, दत्ता भोसले, गुणवंत लवांडे, तानाजी गरड, हेमंत पाटील, बाळासाहेब जाधव, विठ्ठल संपते,किशनराव शिंदे, अशोक काळे,शाम जाधव यांच्यासह असंख्य शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.

पान १ वरून...

### पक्षाच्या आंदोलनास नेत्यांचीच दांडी

राहिले नाही. विशेष म्हणजे कार्यकर्त्यां प्रमाणेच पोलिसांनाही भान राहिले नाही की काय ?असे यावेळी स्पष्टपणे जाणवले. राज्यातील सत्ताधारी पक्ष आंदोलन करत असताना त्यांच्यावर कारवाई तर सोडाच परंतु सूचना करण्याचेही पोलिसांनी टाळले.त्यामुळे पोलिसांदेखत शासकीय निर्देश पायदळी तुडवत काँग्रेसचे आंदोलन संपन्न झाले.

### राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी

लालबहादूर शास्त्री यांचे महत्त्वपूर्ण योगदान आणि मोलाचे कार्य आहे महात्मा गांधी चे धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रातीलयोगदान प्रेरणादायी ठरते त्यांच्या विचारांना विनम्र अभिवादन याप्रसंगी महात्मा फुले महाविद्यालयातील प्रा सदाशिव वरवटे प्रा संजय जगताप, प्रा विठ्ठल चव्हाण प्रा प्रभाकर स्वामी, प्रा बळी कासलवार, अनिल भदाडे, किशन धरणे, शिवाजी हुबाड, शिवराज स्वामी आदि उपस्थीत होते, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्रा बालाजी आचार्य यांनी केले तर शेवटी आभार प्रा संजय जगताप यांनी मानले.

### शेतकरी विरोधी काळे कायदे रद्द करण्यासाठी लातूरात काँग्रेस चे धरणे आंदोलन

आंबेडकर पार्क, गुळ मार्केट,बस्वेश्वर चौक,राजीव गांधी चौक,नंदी स्टॉप,छत्रपती शिवाजी महाराज चौक,लोकमान्य टिळक चौक, मार्ग डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे रैली चा समारोप करण्यात आला केंद्र सरकारने शेतकरी वीरोधी कायदा रद्द करावा अन्यथा उग्र आंदोलन करण्याचा इशारा प्रदेश काँग्रेस निरिक्षक आमदार राजेश राठोड यांनी लातूर येथे माध्यमांशी बोलताना दिला आहे पुढे बोलताना आमदार राठोड म्हणाले की केन्द्र सरकार हुकुमशाही पध्दतीने वागत आसुन खासदार राहुल गांधी यांच्यावर उत्तरप्रदेश सरकारने केलेल्या धक्का बुक्कीचा निषेध व्यक्त करुन तातडीने कारवाई करावी अशी मागणी त्यानी यावेळी केली

यावेळी शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अँड किरण जाधव यांनी केंद्र सरकारच्या घेतलेल्या कायद्याचा निषेध व्यक्त केला आहे

या धरणे आंदोलनास राज्याचे सार्वजनीक बांधकाम राज्यमंत्री संजय बनसोडे, शेतकरी कामगार पक्षाचे अँड उदय गवारे यानी पाठिंबा देऊन केंद्र सरकारच्या कायद्याचा विरोध करित कायदे रद्द करावेत अशी मागणी केली आहे

या धरणे आंदोलनात जिल्हा काँग्रेस अध्यक्ष श्रीशैल्य उटगे,शहर जिल्हा अध्यक्ष अँड किरण जाधव,माजी जिल्हाध्यक्ष अँड व्यंकट बेद्रे,महापौर विक्रांत गोजमगुंडे,विरोधी पक्ष नेते अँड दिपक सुळ,जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष पृथ्वीराज सिरसाठ, बाजार समितीचे उपसभापती मनोज पाटिल, माजी महापौर स्मिता खानापुरे, महिला काँग्रेस जिल्हा अध्यक्ष सौ सुनिता आरळीकर, शहर जिल्हा अध्यक्ष सौ सपना किसवे, काँग्रेस तालुका अध्यक्ष राजेसाहेब सवई, युवक काँग्रेस चे अध्यक्ष मोहन सुरवसे, तालुका युवक काँग्रेस चे अध्यक्ष रघुनाथ शिंदे, खाजाभानु बुर्हान, जिल्हा बँकेच्या सन्चालीका सौ स्वयंप्रभा पाटिल प्रा. ओमप्रकाश झुरुळे, प्रविण पाटिल, सचिन दाताळ, मारुती महाराज साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन शाम भोसले, प्रा. सुधिर आनवले, हरिराम कुलकर्णी, प्रविण सुर्यवंशी, बिरबल देवकत्ते, अँड फारुख शेख, सय्यद रफिक, शरद देशमुख, अँड प्रदीपसींह गन्गाने, दगडू मिटकरी, केशरबाई महापुरे, सिकंदर पटेल, अँड देवीदास बोरुळे पाटिल, महेश काळे, संजय ओव्होळ, नेताजी बादाडे, दगडू मिटकरी, अमोल भिसे, पंडीत कदम, सुलेखा कारेपुरकर, चंद्रशेखर दंडीमे, व्यंकटेश पूरी, संजय जगताप विविध फ्रँट चे अध्यक्ष, पदाधिकारी, इन्टक, महिला, काँग्रेस कार्यकर्ते शेतकरी कामगार उपस्तीत होते.

### हाथसर अत्याचार प्रकरणी सम्राट मित्रमंडळाचे धरणे निदर्शने अंदोलन

फास्ट ट्रॅक न्यायलायात चालवावा,दोषी आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी.दोषी पोलीस अधिकार्यांवर गुन्हे दाखल करावेत,सदरील कुटुंबाचे पुनर्वसन करून पन्नास लाख रुपयांचे सानूग्रह अनुदान मंजूर करावे,देशात अशा घटना घडनार नाहीत याची दक्षता घ्यावी.आदी मागण्या करण्यात आल्या.

या वेळी प्रशांत जाभाडे,अजय भालेराव,शिवाजीराव भालेराव,गफारखान पठाण,मेघराज गायकवाड, मोहम्मद पठाण, अँड.सपना गायकवाड,राणी गायकवाड मूज्जमील खूरेशी, मोबीन तांबोळी,तबरेज सय्यद, सय्यद नौशाद,शेख नूर मोहम्मद, सचिन बानाटे,हुसेन कोतवाल,शेख हाशमभाई,शेख मतीन आदींची उपस्थिती होती.

### शेतकरी-कामगार विरोधी कायद्याचा निषेधार्थ काँग्रेसचे धरणे आंदोलन

संचालक सुनील चव्हाण, जिल्हा संघटक राजेंद्र शेरखाने, तालुकाध्यक्ष लक्ष्मण सरडे, शहराध्यक्ष अग्निवेश शिंदे, नगरसेवक सिद्धार्थ बनसोडे, युवकचे प्रदेश सचिव उमेश राजेनिंबाळकर, रोहित पडवळ, प्रशांत पाटील, जावेद काझी, ओबीसी विभागाचे धनंजय राऊत, मिलिंद गोवर्धन, असंघटित कामगार अध्यक्ष देवानंद येडके, -वीं.राज कुलकर्णी, उस्मान कुरेशी, शहाजी मुंडे सर, हरिभाऊ शेळके, मूहिब शेख, अब्दुल लतीफ, सुरेंद्र पाटील, विधी विभागाचे अध्यक्ष -वीं. विश्वजित शिंदे, -वीं.गणपती कांबळे, -वीं.राहुल लोखंडे, संजय गजधने, बालाजी बिदे, प्रेम सपकाळ, सचिन चव्हाण, समाधान घाटशिळे, भरत चव्हाण, इलियास खान, नितीन माने, प्रसन्न कथले, सौरव गायकवाड, अदनान सिद्दीकी सहभागी होते.

यावेळी कार्यकर्त्यांनी *शेतकरी-मजदूर बचाव, शेतकरी विरोधी कायदे रद्द करा, केंद्र सरकारचा निषेध असो अश्या जोरदार घोषणा दिल्या.

### कुटूंब सल्ला केंद्र औसा येथे परमपूज्य महात्मा गांधी यांची जयंती साजरी

केंद्रातील सर्वच सन्माननीय सदस्य उपस्थीत असतात परंतू कोरोना महामारीमुळे मोजक्याच सदस्यांच्या आजची जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अँड. मोहिनी पाठक उपस्थित होत्या तसेच समितीचे अध्यक्ष उमेश पाठक यांनी महात्मा गांधींच्या प्रतिमेला पुष्पहार घालून प्रतिमेची पूजा करण्यात आली यावेळी विनायक मोरे, राम कांबळे, अनुसया सुर्यवंशी, अच्युऊ पाटील, बालाजी कांबळे आदी उपस्थित होते.

# १३८० लहान मोठी झाडे लावून शहराचा पुर्व भागाचे मुख्य रस्ते हरीत करण्याचा संकल्प पुर्ण

## ग्रीन लातूर वृक्ष टिम चा वृक्षारोपण व वृक्षसंगोपनाचा झंझावत.

लातूर/प्रतिनिधी :

लातूर जिल्हा व परीसरात सातत्याने वृक्ष लागवड व वृक्ष संगोपन करत असलेल्या ग्रीन लातूर वृक्ष टिमने शहराचा पुर्व भाग हरीत करण्याचा ध्यास घेतला होता. याअंतर्गत साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे चौक ते छत्रपती शाहू महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते स्वामी विवेकानंद चौक ते जिवाजी महाले चौक (गरुड चौक) या मुख्य रस्तावर वृक्षारोपण करण्याचा संकल्प करण्यात आला. यानुसार या रस्त्यावरील सर्व दुभाजक, रस्ता दुतर्फा कनेरी, टिकोमा, कडुनिंब, बिट्टि, पिंपळ, सिगापूर चेरी या वृक्षांची लागवड सरु करण्यात आली. गेली एक वर्ष सातत्याने सुरु असलेल्या या उपक्रमात लावलेल्या झाडांचे संगोपन करण्याचे, झाडांना



टॅकरद्वारे पाणी देणे, झाडांना आळे करणे, काठ्या बदलणे, खराब झालेली झाडे बदलणे, झाडांभोवती वाढलेले गवत काढणे ही सर्व कामे करण्यात आली. वर्षभरात ५६ मोठ्या टॅकरद्वारे पाणी देण्यात आले.

या उपक्रमांतर्गत या मुख्य रस्त्यावर ४०० लहान झाडे व ९८० मोठी झाडे लावण्यात आली. प्रत्येक झाडांना काठ्या, जाळ्या बसविण्यात आल्या. झाडांच्या शेजारी असलेले घर, दुकान यांना त्या झाडांचे पालकत्व देण्याचा प्रयत्न केला गेला. यापध्दतीने शहराचा दुर्लक्षीत असा पुर्वभाग हरीत करण्याकरीता ग्रीन लातूर वृक्ष टिमने केलेला संकल्प आज पुर्ण झाला, यानंतर लावलेल्या झाडांचे नियमित संगोपन सुरु राहील अशी माहीती ग्रीन लातूर वृक्ष टिमचे डॉ पवन लड्डा, व मनपा लातूर नगरसेवक इम्रान सय्यद यांनी दिले. वर्षभराचा हा सर्व उपक्रम यशस्वी करण्याकरीता ग्रीन लातूर वृक्ष टिमचे डॉ. पवन लड्डा, मनपा लातूर नगरसेवक इम्रान सय्यद, प्रमोद निपानीकर. मनमोहन डागा, दिशा प्रतिष्ठानच्या ड. वैशाली यादव, रुषिकेश दरेकर, हितेश डागा, चैतन्य प्रयाग, पुजा निचळे, विकास कातपुरे, गंगाधर पवार, जफर शेख, रूषीकेश पोद्दार, सार्थक शिंदे, शुभम अट्टल, सुलेखा कारेपुरकर, डॉ. भास्कर बोरगावकर, पद्माकर बागल, प्रफुल्ल भोसले, मोईज मिर्झा, कल्पना फरकांडे, शैलेश सुर्यवंशी, सिताराम कंजे, प्रसाद जाधव, प्रसाद श्रीमंगलगे,डॉ. मुश्ताक सय्यद, डॉ. मंजुषा कुलकर्णी, ड. सर्फराज पठाण, सुहास पाटिल, लक्ष्मी बटनपुरकर, सीमा धर्माधिकारी, विमल रेड्डी, महेष गेलडा, श्रृती मालू, श्रध्दा तापडीया, शुभम आवाड, महेश कदम, संकेत कुलकर्णी, प्रसाद शिंदे, नामदेव सुब्बणवाड, ड. व्यंकटेश बेल्लाळे, श्रद्धा नरवडे, संदेश जाधव, गौरव पाटिल, यांनी खड्डे खोदणे, झाडे-जाळ्या-काठ्या लावणे, पानी देणे, संगोपन करणे याकरीता कठोर परिश्रम घेतले.

# लाहोटी स्कूलमध्ये महात्मा गांधी यांच्या सार्धशताब्दी सोहळ्याची सांगता - विशेष चित्रफिती चे विमोचन

लातूर/प्रतिनिधी :

येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५१ तर देशाचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची ११६ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महात्मा गांधी यांच्या जन्मशताब्दी निमित्त स्कूलमध्ये वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करून जन्मशताब्दी सोहळा साजरा करण्यात आला होता. त्याची सांगता जयंती दिनी करण्यात आली.



प्रारंभी स्कूलचे प्राचार्य कर्नल एस. ए. वरदन यांनी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. याप्रसंगी रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर, कॅप्टन बी. के. भालेराव, मुख्याध्यापिका विद्या साळवे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थितांना संबोधित करताना प्राचार्य कर्नल वरदन म्हणाले की स्वच्छ भारत सर्वेक्षण अभियाना अंतर्गत स्कूलला मिळालेला स्वच्छतेचा पुरस्कार'ही विद्यालया द्वारे महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांना अर्पण केलेली आदरांजली आहे. स्वच्छता ही स्वच्छता कर्मचाऱ्यांची जबाबदारी नसून समाजातील प्रत्येक स्तरावरील घटकांनी याची जबाबदारी घेतली पाहिजे.

प्रत्येकाने मन स्वच्छ करून निर्मळ ठेवले तर समाजामध्ये सर्वत्र स्वच्छता होईल. महात्मा गांधी यांचे सार्ध शताब्दी वर्ष ही राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल साठी विशेष उपलब्धीसह मैलाचा दगड सिद्ध झाला आहे. स्वच्छ भारत सर्वेक्षण २०१९ अंतर्गत स्वच्छ विद्यालय पुरस्कार ते चरित्र निर्माणाचे उपक्रम, राष्ट्रीय वाहिनी द्वारे दखल ते आकाशवाणीवरून विद्यार्थ्यांचे संबोधन, जनजागृती मेळा ते एखादी चळवळ अशा अनेक उपलब्धीच्या माध्यमातून महान विभूतींचे विचार विद्यालय जगत आहे असेही प्राचार्य म्हणाले. या सर्व उपलब्धिन्ना उजाळा देणारी ' रघुपती राघव राजा राम पतित पावन सिता राम.....' या गांधीजींच्या आवडत्या भजना वरील संगीत विभागाद्वारे स्वरबद्ध केलेल्या चित्रफितीचे विमोचन प्राचार्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा वराडे यांनी तर आभार प्रदर्शन महेशकुमार भैरी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संदीप केंद्रे, मनोज शिवलकर, शिरीष देशपांडे, तेजस धुमाळ, हनुमंत थडकर, अमोल देशमुख आशिद बनसोडे, प्रकाश जकोटिया, विवेक डोंगरे आदींनी परिश्रम घेतले.

## जाहीरनामा

### (वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत)

**श्री.एन.जी.व्यास साहेब, सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर, निलंगा यांचे न्यायालयात**

कि.अर्ज क्रं.४४१/२०२० नि.क्र. ०८

ज्यापेक्षा चॉदपाशा लालमहमद शेख, रा. निलंगा, ता. निलंगा, जि. लातूर हे दिनांक २४/६/२०२० रोजी येथे मयत झाले व आणि अर्जदार -

१) हजराबी चॉदपाशा शेख, वय ६९ वर्षे, धंदा-घरकाम, रा. निलंगा, ता. निलंगा, जि. लातूर.
२) मुमताज दगडू शेख, वय ४४ वर्षे, धंदा-घरकाम, रा. लातूर ता.जि. लातूर
३) लालमहमद चॉदपाशा शेख, वय ४२ वर्षे, धंदा-नौकरी, रा. निलंगा, ता. निलंगा, जि. लातूर.
४) शरीफाबी फकरोदीन पटेल, वय ३७ वर्षे, धंदा-घरकाम, रा. औराद शहा, ता. निलंगा, जि. लातूर.
५) आरीफा सिकंदर शेख, वय ३८ वर्षे, धंदा-घरकाम, रा. लातूर ता.जि. लातूर
६) अली चॉदपाशा शेख, वय ३३ वर्षे, धंदा-शेती,
७) युनुस चॉदपाशा शेख, वय २९ वर्षे, धंदा-शेती
८) सद्दाम चॉदपाशा शेख, वय २७ वर्षे, धंदा-शेती,
९) रियाज चॉदपाशा शेख, वय ३३ वर्षे, धंदा-शेती, ०६ ते ०९ रा. निलंगा, ता. निलंगा, जि. लातूर.

// विरुध्द //

गैरअर्जदार कोणीही नाही.

यांनी या न्यायालयास सदरहू चॉटपाशा लालमहमद शेख यांच्या पश्चात वरील अर्जदारांनी यांच्या मयताचे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्या पुष्ठयर्थ अर्जदार क्र. ०४ चे शपथपत्र चॉटपाशा लालमहमद शेख यांचे मुळ मृत्यूप्रमाणपत्र व पोलिस पाटील, सिंदखेड, ता. निलंगा यांनी दिलेले यांचे वारसाचे प्रमाणपत्र सोबत जोडलेले आहे.

यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत, त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : १९/८/२०२० माझ्या सहीने व न्यायलयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील दि. : २८/९/२०२०

स्वाक्षरीत/-
**(महादेवप्पा वि. पाटील)**
क. लिपीक

कोर्टाचा शिक्का

आदेशावरुन
**(सौ. एस.जी. देशपांडे)**
**सहा.अधिक्षक,**
सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर, निलंगा

याची एक प्रत : नगर परिषद कार्यालय, निलंगा, ता. निलंगा, जि. लातूर

# सीएसके चे प्रयत्न तोकडेच, रंगतदार सामन्यात सनराईजर्स हैदराबादची बाजी

## धोनी-जाडेजाची झुंज अपयशी, ७ धावांनी हैदराबादचा विजय

मुंबई/वृत्तसंस्था :

आयपीएलच्या तेराव्या हंगामात चेन्नई सुपरकिंग्जच्या खराब कामगिरीचं सत्र सुरुच आहे. दुबईच्या मैदानावर झालेल्या सामन्यात सनराईजर्स हैदराबादने चेन्नई सुपरकिंग्जवर ७ धावांनी मात केली. तेराव्या हंगामात चेन्नई सुपरकिंग्जच्या पराभवाची ही हॅटट्रीक ठरली आहे. सलामीच्या सामन्यात मुंबई इंडियन्सला हरवल्यानंतर चेन्नईला राजस्थान, दिल्ली आणि हैदराबाद या तीन संघाकडून पराभव पत्करावा लागला आहे. आघाडीच्या फळीतल्या फलंदाजांनी केलेली हाराकिरी चेन्नईच्या पराभवाला कारणीभूत ठरली आहे. हैदराबादच्या गोलंदाजांनी या सामन्यात टिच्चून मारा करत चेन्नईच्या फलंदाजांना संधीच दिली नाही. शेवटच्या षटकांत धोनी-जाडेजाने फटकेबाजी करत सामन्यात रंगत आणली. परंतू अखेरीस चेन्नईचे हे प्रयत्न ७ धावांनी तोकडेच पडले. चेन्नईचा संघ १५७ धावांपर्यंतच मजल मारु शकला.

१६५ धावांचा पाठलाग करताना चेन्नईची सुरुवात खराब झाली. सलामीवीर शेन वॉटसन भुवनेश्वर कुमारच्या गोलंदाजीवर स्वस्तात माघारी परतला. यानंतर संघात पुनरागमन करणारा रायुडूही फारशी चमक दाखवू शकला नाही. टी. नटराजनने रायुडूचा त्रिफळा उडवला, तो फक्त ८ धावा करु शकला. यानंतर फॉर्मात असलेला फाफ डु-प्लेसिसही चोरटी धाव घेताना धावबाद झाला. अष्टपैलू केदार जाधवनेही अब्दुल समदच्या गोलंदाजीवर विकेट फेकत संघाला आणखीनच संकटात टाकलं. यानंतर मैदानावर आलेल्या रविंद्र जाडेजा आणि महेंद्रसिंह धोनीने भागीदारी करत संघाचा डाव सावरला. धोनी-जाडेजा जोडीने यानंतर संघाची पडझड थांबवली तरीही अपेक्षित धावगती कायम राखण्यात ते अपयशी ठरले. पाचव्या विकेटसाठी दोन्ही फलंदाजांनी ७२ धावांची भागीदारी करत संघाचं आव्हान कायम राखलं. अखेरच्या षटकांत जाडेजाने फटकेबाजी करत आपलं अर्धशतकही पूर्ण केलं. परंतू नटराजनच्या गोलंदाजीवर फटकेबाजी करण्याच्या प्रयत्नात तो ५० धावांची खेळी करुन माघारी परतला. यानंतर धोनीने फटकेबाजी करत धावा जमवण्याचा प्रयत्न केला, परंतू दुबईच्या उष्ण वातावरणात धावा काढताना धोनीलाही थकायला झालं होतं. तरीही अखेरच्या षटकांत धोनीने संघाला विजयासाठी २८ धावांच्या आव्हानापर्यंत आणून ठेवलं. भुवनेश्वर कुमारं १९ वं षटक टाकताना दुखापतग्रस्त झाल्यामुळे हैदराबादकडून अखेरचं षटक अब्दुल समदने टाकलं. समोर धोनीसारखा फलंदाज असतानाही समदने आश्वासक कामगिरी करत संघाला विजय मिळवून दिला. हैदराबादकडून टी.नटराजनने २, भुवनेश्वर कुमारने १ तर अब्दुल समादने १ बळी घेतला.

त्याआधी, सलग दोन सामन्यांत पराभव स्वीकारल्यानंतर टीकेचं धनी झालेल्या चेन्नई सुपरकिंग्जने आश्वासक खेळ केला. सनराईजर्स हैदराबादविरुद्ध सामन्यात चेन्नईने टिच्चून मारा करत हैदराबादला १६४ धावांवर रोखण्यात यश मिळवलं. हैदराबादचा कर्णधार डेव्हिड वॉर्नरने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय



घेतला. मात्र चेन्नईच्या गोलंदाजांनी सुरेख मारा करत हैदराबादच्या फलंदाजांना जखडून ठेवलं. वॉर्नर-बेअरस्टो-पांडे, विल्यमसन हे हैदराबादचे महत्वाचे फलंदाज झटपट माघारी परतल्यामुळे संघ महत्वाच्या षटकांत धावा करु शकला नाही. परंतू प्रियम गर्ग आणि अभिषेक शर्मा या युवा फलंदाजांनी अखेरच्या षटकांत फटकेबाजी करत संघाला आश्वासक धावसंख्येचा टप्पा गाठून दिला. हैदराबादकडून प्रियम गर्गने नाबाद ५१ धावा केल्या.पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या सनराईजर्स हैदराबादची सुरुवात खराब झाली. सलामीवीर जॉनी बेअरस्टो दीपक चहरच्या भन्नाट इनस्विंगवर क्लिन बोल्ड होऊन माघारी परतला. यानंतर कर्णधार डेव्हिड वॉर्नर आणि मनिष पांडे यांनी छोटेखानी भागीदारी करत संघाचा डाव सावरला. ही जोडी मैदानावर स्थिरावतेय असं वाटत असतानाच मराठमोळ्या शार्दुल ठाकूरने मनिष पांडेला माघारी धाडलं. पांडेने २९ धावा केल्या. यानंतर ठराविक अंतराने डेव्हिड वॉर्नरही मोठा फटका खेळण्याच्या नादात झेलबाद झाला. सीमारेषेवर फाफ डु-प्लेसिसने वॉर्नरचा सुरेख झेल घेतला. वॉर्नरने २८ धावा केल्या. चेन्नईच्या गोलंदाजांनी पहिल्या चेंडपासून हैदराबादच्या फलंदाजांवर अंकुश लावला होता. ज्यामुळे मोक्याच्या षटकांमध्ये हैदराबादच्या फलंदाजांवर दडपण आलं. केन विल्यमसनही प्रियम गर्गसोबत एकेरी धाव घेताना धावबाद झाला. महत्वाचे सर्व फलंदाज माघारी परतल्यानंतर अभिषेक वर्मा आणि प्रियम गर्ग जोडीने जबाबदारी आपल्या अंगावर घेत फटकेबाजीला सुरुवात केली. दोन्ही फलंदाजांनी पाचव्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी केली. अखेरच्या षटकात दीपक चहरने अभिषेक शर्माला माघारी धाडत हैदराबादला आणखी एक धक्का दिला. मात्र प्रियम गर्गने अखेरपर्यंत किल्ला लढवत आपलं अर्धशतक साजरं केलं. चेन्नईकडून दीपक चहरने २ तर शार्दुल ठाकूर आणि पियुष चावलाने प्रत्येकी १-१ बळी घेतला.

# महात्मा गांधींच्या जयंतीच्या दिवशीच लाखो रुपये किंमतीचा मद्यसाठा जप्त

वर्धा/वृत्तसंस्था :

महात्मा गांधी यांचे प्रेरणास्थळ म्हणून दारूबंदी असलेल्या वर्धा जिल्ह्यात आज गांधी जयंतीलाच लाखो रूपये किंमतीची चोरट्या वाटेने येणारी दारू जप्त करण्यात पोलिसांना यश आले. महात्मा गांधी यांची पुण्यभूमी असल्याने एक आदर्श म्हणून वर्धा जिल्ह्यात अनेक वर्षांपासून दारूबंदी आहे. मात्र असे असूनही चोरटी दारू वाहतूक व जिल्ह्यातच हातभट्टीतून निघणारा दारूचा महापूर नवा नाही. मात्र आज गांधी जयंतीलाच दारूसाठा आणणाऱ्या वर्धा येथील दारू विक्रेता विक्की जयस्वाल याच्यावर कारवाई झाली. यवतमाळ येथून पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारमध्ये वर्धा यथे दारू येत असल्याची माहिती मिळाल्यानंतर वर्धा पोलिसांनी या गाडीला वर्ध्याजवळ गिरोली येथे नाकाबंदी करून थांबण्याचा इशारा दिला. मात्र पोलीस दिसताच आरोपीने गाडी वळवून दूरूनच पळण्याचा प्रयत्न केला. शेवटी पोलिसांना शेतात ही कार सापडली.

आरोपी मात्र पळ काढण्यात यशस्वी झाले. गाडीची तपासणी केल्यानंतर देशी दारूच्या १ हजार ४४० बाटल्या आढळून आल्या. त्याची किंमत १ लाख ४४ हजार रूपये व गाडीची किंमत ३ लाख असा जवळपास साडेचार लाखाचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त करण्यात आला.

## आजचे राशी भविष्य

**दि. ३ ऑक्टोंबर २०२०**
**कसा असेल तुमचा दिवस, जाणून घ्या...**



मेष:-आपल्या तत्वाला थोडी मुरड घालावी लागेल. जवळचा प्रवास करताना आरोग्याची काळजी घ्या. अकल्पित घटनांना धिटाईने सामोरे जा. कार्यक्षेत्रात नवीन अधिकार मिळतील. आततायीपणा करून चालणार नाही.

वृषभ:-बोलण्यात खंबीरपणा ठेवावा. तुमच्याबाबत इतरांचा गैरसमज होऊ शकतो. कौटुंबिक सौख्य लाभेल. कुटुंबातील सदस्यांचे मत जाणून घ्या. मित्रांची संगत तपासून पहा.

मिथुन:-आवडत्या व्यक्तीची भेट होईल. काही निर्णयासाठी थांबावे लागेल. वरिष्ठांचा पाठिंबा मिळेल. व्यापारी वर्गाला भागिदारीतून लाभ मिळेल. जोडीदाराचे सक्रिय सहकार्य मिळेल.

कर्क:-जोडीदाराच्या मताचा विचार करा. आळसात दिवस ढकलू नका. नवीन ओळखीचा लाभ होईल. भावनिक विचार करू नका. दैनंदिन कामात चिकाटी बाळगा.

सिंह:-डोके शांत ठेवून काम करावे. नेटाने व्यायाम करावा. मन चंचल राहील. व्यापारी वर्गाला चांगला लाभ होईल. माणसे ओळखायला शिकावे.

कन्या:-अधिकाराचा वापर योग्य ठिकाणी करावा. मानसिक संतुलन बिघडू देऊ नका. आहारावर नियंत्रण ठेवावे. मनातील इच्छा पूर्ण होईल. अन्यथा पोटाचे विकार त्रस्त करू शकतात.

तूळ:-आपला दिवस आनंदात जाईल. लहान प्रवासाची शक्यता. मार्गदर्शक व्यक्तींच्या भेटीचा योग. कामातील तांत्रिक बाबी जाणून घ्याल. सर्व गोष्टींची खातरजमा करावी.

वृश्चिक:-कुटुंबात अधिकार प्राप्त होईल. चांगल्या गोष्टीसाठी पैसा खर्च होईल. व्यवसाय वाढीसाठी तज्ञांचा सल्ला घ्या. महिला सहकाऱ्यांची उत्तम साथ मिळेल. नवीन गोष्टी जाणून घेता येतील.

धनू:-जोडीदाराच्या सद्गुणांनी आनंद मिळेल. कर्ज फेडीचे एक पाऊल पुढे टाकाल. कामाच्या ठिकाणी तुमचा सल्ला मोलाचा ठरेल. तुमच्या सूचनांचे स्वागत केले जाईल. आरोग्याची काळजी घ्यावी.

मकर:-आपल्या माणुसकीची इतरांना कल्पना येईल. धडपडया वृत्तीवर संयम ठेवावा. आहारावर नियंत्रण ठेवावे. प्रलंबित कामे पूर्ण करावीत. आजचा दिवस चांगला जाईल.

कुंभ:-मानसिक प्रसन्नता लाभेल. जुन्या मित्रमंडळींशी संवाद होईल. आपल्या वागणुकीने वाहवा मिळवाल. पालकांचा सल्ला मोलाचा ठरेल. आर्थिक लाभाचे योग.

मीन:-घेतलेला निर्णय योग्य ठरेल. जोडीदाराशी असलेले मतभेद दूर होतील. भागीदारीतील व्यवसायातून लाभ होईल. धार्मिक आवड वाढीस लागेल. तुमच्या बोलण्याचा घरातील लोकांवर प्रभाव पडेल.

## ग्रामपंचायत कार्यालय, आर्वी

ता.जि.लातूर

### जाहिर प्रगटन

मौजे आर्वी ता. जि. लातूर येथील सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, मनिषा अनिल जाधव, रा. अंबाजोगाई रोड, लातूर ता. जि. लातूर, यांची खुल्या प्लॉटची जागा/ घर नोंदणी बाबतचा अर्ज व वाटणी पत्र ग्रामपंचायतला दिनांक २/१०/२०२० रोजी खतविण्यासाठी नावे करण्यासाठी प्राप्त झाले आहे.

रजि.क्रं. ५२९४/- दि. १५/९/२०२०

सदर जागेची / घराची चतुःसिमा पुढीलप्रमाणे आहे

पु. - प्लॉट नं. १८ प. प्लॉट नं. २०चा शिल्लक भाग

द. - कुलकर्णी यांची जमीन उ. ७.५० मी. रुंदीचा रस्ता

| गट नं. सर्वे नं. | जागेची साईज | खरेदीदाराचे नांव | विक्रीदाराचे नांव |
|---|---|---|---|
| ग.नं.६३ पै. प्लॉट नं. १९ पुर्ण, २० चा पु. भाग ग्रा.पं.नं. | लांबी - पु. प.दो.बाजू १३.७१ मीटर रुंदी - द.उ. पु.बा.१२.२३ मीटर, प.बा. १२.२४ मी. | मनिषा अनिल जाधव | प्रकाश कोंडीराम पवार, देविदास रामलिंग काळे, रा. लातूर |

**किंमत : २,६५,०००/-**

सदर आतील जागेची नोंद करण्याबाबात कोणाचा आक्षेप / विरोध असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेल्या तारखेपासून (७) दिवसाच्या आत ग्रा.पं.स ला लेखी तक्रार अर्ज करावा.
मुदतीनंतर काही तक्रार आल्यास अशा तक्रारी अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
**ग्रामसेवक / सरपंच**

## ग्रामपंचायत कार्यालय, आर्वी

ता.जि.लातूर

### जाहिर प्रगटन

मौजे आर्वी ता. जि. लातूर येथील सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, कौशल्या मारुती भुरे रा. बनसुडे नगर, लातूर ता. जि. लातूर, यांची खुल्या प्लॉटची जागा/ घर नोंदणी बाबतचा अर्ज व वाटणी पत्र ग्रामपंचायतला दिनांक २/१०/२०२० रोजी खतविण्यासाठी नावे करण्यासाठी प्राप्त झाले आहे.

रजि.क्रं. ५२९७/- दि. १५/९/२०२०

सदर जागेची / घराची चतुःसिमा पुढीलप्रमाणे आहे

पु. - प्लॉट नं. ४७ प. ७.५० मी. रुंदीचा रस्ता

द. - ७.५० मी. रुंदीचा रस्ता उ. प्लॉट नं. ४९

| गट नं. सर्वे नं. | जागेची साईज | खरेदीदाराचे नांव | विक्रीदाराचे नांव |
|---|---|---|---|
| ग.नं.६३ पै. प्लॉट नं. ४६ पुर्ण, ग्रा.पं.नं. | लांबी - पु. प. १२.१९ मीटर रुंदी - द.उ. १०.३७ मीटर | कौशल्या मारुती भुरे | प्रकाश कोंडीराम पवार, देविदास रामलिंग काळे, रा. लातूर |

**किंमत : २,०५,०००/-**

सदर आतील जागेची नोंद करण्याबाबात कोणाचा आक्षेप / विरोध असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेल्या तारखेपासून (७) दिवसाच्या आत ग्रा.पं.स ला लेखी तक्रार अर्ज करावा.
मुदतीनंतर काही तक्रार आल्यास अशा तक्रारी अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
**ग्रामसेवक / सरपंच**

## ग्रामपंचायत कार्यालय, आर्वी

ता.जि.लातूर

### जाहिर प्रगटन

मौजे आर्वी ता. जि. लातूर येथील सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, नबीराफातेमा आसेफहुसेन काझी, यांचे अ.पा.क. म्हणून वडील आसेफहुसेन मुबारेजहुसैने काझी रा. जाफर नगर, लातूर ता. जि. लातूर, यांची खुल्या प्लॉटची जागा/ घर नोंदणी बाबतचा अर्ज व वाटणी पत्र ग्रामपंचायतला दिनांक २/१०/२०२० रोजी खतविण्यासाठी नावे करण्यासाठी प्राप्त झाले आहे.

रजि.क्रं. ३१४४/- दि. १७/८/२०२०

सदर जागेची / घराची चतुःसिमा पुढीलप्रमाणे आहे

पु. - ९ मी. रुंदीचा रस्ता प. सदर गटातील आमच्या मालकीची जमीन

द. - ९ मी. रुंदीचा रस्ता उ. ओपन स्पेस

| गट नं. सर्वे नं. | जागेची साईज | खरेदीदाराचे नांव | विक्रीदाराचे नांव |
|---|---|---|---|
| ग.नं.२३ पै. प्लॉट नं. १८ पुर्ण, ग्रा.पं.नं. | लांबी - द.उ. १९ मीटर, ५५ सें.मी. रुंदी - पु. प. ११ मीटर | नबीराफातेमा आसेफहुसेन काझी, यांचे अ.पा.क. म्हणून वडील आसेफहुसेन मुबारेजहुसैने काझी | रहेमान रसुलसाब शेख, बाबू रसुलसाब शेख, रा. वीरहनमंतवाडी लातूर |

**किंमत : १,९५,०००/-**

सदर आतील जागेची नोंद करण्याबाबात कोणाचा आक्षेप / विरोध असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेल्या तारखेपासून (७) दिवसाच्या आत ग्रा.पं.स ला लेखी तक्रार अर्ज करावा.
मुदतीनंतर काही तक्रार आल्यास अशा तक्रारी अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
**ग्रामसेवक / सरपंच**

**हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक प्रभुअप्पा त्रिंबकअप्पा मुनाळे यांनी अर्पिता ऑफसेट, मोती नगर, निअर मारोती टेंपल, लातूर, ता.जि.लातूर (महा.)४१३५१२ येथे छापून तेथेच प्रकाशीत केले.**

**संपादक : प्रभुअप्पा त्रिंबकअप्पा मुनाळे** R.N.I. No. 70813/98

PRINTED BY, PUBLISHED BY, OWNER BY & EDITED BY PRABHUPPA TRIBAKAPPA MUNALE, OWNER BY PRABHUPPA TRMBKAPPA MUNALE, PRINTED & PUBLISHED AT ARPITA OFFSET, MOTI NAGAR, NEAR MARUTI TEMPLE, LATUR, MAHA.413512 EDITOR : PRABHUPPA TRIBAKAPPA MUNALE R.N.I. No. 70813/98

